महाराष्ट्र शासन - आरोग्य विभाग

नोदणीकृत कार्यालयः-
राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र, पुणे
पुणे उरो रुग्णालय इमारत, (पहिला मजला) एस.टी.डी.सी पुणे-४११०२७ महाराष्ट्र
दूरध्वनी क्रमांक-०२०-२९७०००५३ Email Id- stdcmh2@rntcp.org

डॉ.अनिरुध्द देशपांडे
मुख्य वैद्यकिय अधिकारी तथा संचालक

जा.क्र.एसटीडीसी-पुणे/ १६९२ /२४
दिनांक: १०-१०-२०२५

## नोटीस

विषयः- पीसीआर टयुब्चा पुरवठा करणेबाबत....

राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र पुणे या कार्यालयांतर्गत असलेल्या प्रयोगशाळेकरिता फाल्कन टयुबची आवश्यकता आहे. तरी सदर फाल्कन टयुबचे खालील तपशिलाप्रमाणे आपले सिलबंद दरपत्रक कार्यालयास पाठवावे, ही विनंती.

दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर हे सर्व कर व इतर सर्व खर्चासह असावेत.

| Sr.No | Particulars | Qty | Rate (Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | Material : PP conforming to USP clas VI, Free of detechable DNase, RNase and Pyrogen autoclavable | 1 No | |

उक्त तपशिलामध्ये नमुद केल्याप्रमाणे आपले दरपत्रक सीलबंद लिफाप्यात दिनांक १६/१०/२०२५ पर्यंत (७ दिवस) या कार्यालयास स्वहस्ते / पोस्टाने कार्यालयीन वेळेत दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करण्यात यावे. त्यानंतर सादर करण्यात आलेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच सदरची दरपत्रके समितीच्या समोर उघडण्यात येतील.

## दरपत्रक सादर करताना मार्गदर्शक सूचना

१) वरील साहित्याचा नमुना प्रथम प्रयोगशाळेमध्ये सादर करुन त्याची मान्यता घेतल्यानंतरच दरपत्रके सादर करण्यात यावे.
२) दरपत्रकावर आपल्या संस्थेचा शिक्का व सही असणे बंधनकारक आहे.
३) दरपत्रके उघडतेवेळी इच्छुक दरपत्रकधारक उपस्थित राहू शकतात.
४) ई-मेल मार्गाने सादर केलेल्या दरपत्रकांचा स्वीकार केला जाणार नाही.

५) दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर हे अटी व शर्तीसह असल्यास दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

६) दरपत्रकात नमूद केलेले दर हे उपलब्ध बाजार भावापेक्षा जास्त नसावे.

७) दरपत्रकामध्ये खाडाखोड केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

८) विहीत मुदतीत सादर न केलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

९) दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर/ किंमत सर्व करासहित असावे.

१०) एका संस्थेने फक्त एकच दरपत्रक सादर करावे.

११) दरपत्रके स्विकारणे अथवा पुर्णतः नाकारण्याचा पूर्ण अधिकार मुख्य वैद्यकीय अधिकारी, राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र पुणे यांनी राखुन ठेवले आहेत.

९/१०/२५

मुख्य वैद्यकीय अधिकारी
राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र पुणे

प्रत : - सदर प्रत कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता